पुण्य नगरी ■ रविवार, १ फेब्रुवारी २०२६

# भूगोल विषयावर 'जिओ-फेस्ट २०२६' उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकानंद कॉलेजमध्ये 'जिओ फेस्ट २०२६' उत्साहात पार पडले. भूगोल विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या वतीने या दोन दिवसीय कार्यशाळेसाठी विद्यार्थी, पालक, संशोधक व प्राध्यापक उपस्थित होते.

पहिल्या दिवशी भूगोल विषयातील सखोल ज्ञानावर आधारित प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात आली, तर सायंकाळी हौशी खगोल अभ्यासक अनिल गवळी यांचे 'विश्वाचा पसारा' या विषयावर व्याख्यान झाले. त्यानंतर आकाश निरीक्षण कार्यक्रम झाला. दुसऱ्या दिवशी शुभम यादव यांच्या



**कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील 'जिओ फेस्ट २०२६' स्पर्धेतील यशस्वी सहभागींना गौरविताना मान्यवर.**

'अवकाश संशोधन व सुदूर संवेदन क्षेत्रातील संधी' या व्याख्यानाने कार्यक्रमाची सांगता झाली. प्रश्नमंजूषा स्पर्धेतील विजेत्यांचा, पदवी व पदव्युत्तर वर्गातील उच्च श्रेणी प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले.

प्राचार्य डॉ. संजय थोरात व आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम यशस्वी झाला. कार्यक्रमाचे संयोजक डॉ. एच. पी. पाटील, कार्यशाळा समन्वयक डॉ. शुभांगी काळे, विभागप्रमुख डॉ. जी. एस. उबाळे, डॉ. निशा सुर्वे, डॉ. सिद्धार्थ घोडेराव, डॉ. विठ्ठल पाटील, सागर पवार, आर्या जोशी, वैशाली पालकर, अश्विनी मुरवणे यांनी विशेष सहकार्य केले. डॉ. बापूजी साळुंखे इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटचे प्राचार्य डॉ. सुहास सपाटे, फोटोग्राफी विभागप्रमुख रवी सुतार आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन विद्यार्थिनी प्रतिमा हजारे, धनश्री नागरे यांनी केले. तांत्रिक साहाय्य नामदेव माने, राम बोंगे यांनी केले.

पुण्य नगरी

रविवार, १ फेब्रुवारी २०२६

# 'विवेकानंद'ची शिक्षणमहर्षी डॉ. साळुंखे राज्यस्तरीय स्पर्धेत बाजी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचालित विवेकानंद कॉलेज येथील विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि गुरुदेव कार्यकर्त्यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे राज्यस्तरीय स्पर्धांच्या विभागीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करत महाविद्यालयाने अव्वल स्थान पटकावले. राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जुना बुधवार पेठ येथे ही विभागीय स्पर्धा पार पडली.

महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी गटातील यशस्वी विद्यार्थी-विद्यार्थिनी असे, अनुराधा कांबळे - प्रथम क्रमांक (वक्तृत्व स्पर्धा), शुभम दरगडे - प्रथम क्रमांक (चित्रकला स्पर्धा), सुप्रिया कुंभार - द्वितीय क्रमांक (कराओके स्पर्धा). गुरुदेव कार्यकर्ता गटातील सागर कांबळे - द्वितीय क्रमांक (कराओके स्पर्धा), प्रा. सतीश उपळावीकर - तृतीय क्रमांक (चित्रकला स्पर्धा), प्रियांका कांबळे - तृतीय क्रमांक (वक्तृत्व स्पर्धा) असे यश मिळवले. ज्युनिअर कॉलेज (कनिष्ठ महाविद्यालय) गटात वक्तृत्व स्पर्धा : प्रथम - श्रेया इंदूरकर; द्वितीय - वेदिका मोरे, सुगम गायन स्पर्धा : प्रथम - साई गुंडकल्ले, टॅलेंट सर्च स्पर्धा : प्रथम - श्रावणी सांगळे, चित्रकला : द्वितीय - सायमा गोलंदाज यांनी यश मिळवले. विवेकानंद कॉलेज शाखा समन्वयक प्रा. अविनाश गायकवाड, डॉ. आर. वाय. पाटील, डॉ. कैलास पाटील, डॉ. अस्मिता तपासे, डॉ. समीक्षा फराकटे, डॉ. संजय अंकुशराव, डॉ. सुमय्या इनामदार, डॉ. प्रदीप पाटील, प्रा. सतीश उपळावीकर आदींनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांनी यशस्वी झालेल्यांचे अभिनंदन केले. शाखास्तरीय स्पर्धेसाठी आंतरिक गुणवत्ता हमी कक्ष विभागाच्या प्रमुख डॉ. श्रुती जोशी, रजिस्टार सचिन धनवडे, सदानंद दुर्गुळे यांचे सहकार्य मिळाले. स्पर्धा शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतर्फे राज्यस्तरीय स्तरावर आयोजित केली जाते.

26

5
2-2026

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा • रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६

# विविध स्पर्धांमध्ये विवेकानंद कॉलेजचे यश

## • विद्यार्थी व शिक्षकांच्या अंतर्गत स्पर्धा

**जनप्रवास : कोल्हापूर**

विवेकानंद कॉलेजमधील विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि शिक्षक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे राज्यस्तरीय स्पर्धांच्या विभागीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करत महाविद्यालयाला अव्वल स्थान पटकावले. राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये या स्पर्धा झाल्या.

महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी गटातील यशस्वी विद्यार्थी-विद्यार्थिनीमधे अनुराधा कांबळे - प्रथम क्रमांक (वक्तृत्व स्पर्धा), शुभम दरगडे - प्रथम क्रमांक (चित्रकला स्पर्धा), सुप्रिया कुंभार - द्वितीय क्रमांक (कराओके स्पर्धा) यात यश संपादन केले. शिक्षक गटातील सागर कांबळे - द्वितीय क्रमांक (कराओके स्पर्धा), प्रा. सतीश उपळावीकर - तृतीय क्रमांक (चित्रकला स्पर्धा), प्रियांका कांबळे - तृतीय क्रमांक (वक्तृत्व स्पर्धा) यांनी यश संपादन केले. ज्युनियर कॉलेज गटात वक्तृत्व स्पर्धा : श्रेया इंदुरकर प्रथम, वेदिका मोरे द्वितीय, सुगम गायन स्पर्धा : नारायण साई प्रथम, टॅलेंट सर्च स्पर्धा : श्रावणी सांगळे प्रथम, चित्रकला : सायमा गोलंदाज द्वितीय क्रमांक संपादन केला. या स्पर्धेच्या शाखास्तरीय फेरीत निवड झालेल्या विद्यार्थी व गुरुदेव कार्यकर्त्यांनी विभागीय स्तरावरही उत्कृष्ट कामगिरी दाखवली.

प्रा. अविनाश गायकवाड, डॉ. आर. वाय. पाटील, डॉ. कैलास पाटील, डॉ. अस्मिता तपासे, डॉ. समीक्षा फराकटे, डॉ. संजय अंकुशराव, डॉ. सुमय्या इनामदार, डॉ. प्रदीप पाटील, प्रा.सतीश उपळावीकर यांनी स्पर्धेचे नियोजन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांनी सर्व यशस्वी स्पर्धक, समन्वयक व सहभागी शिक्षकांचे अभिनंदन केले.